ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधान: ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० पुणें, बुधवार तारीख २२ सप्टेंबर, १९५४ अंक ३७

## विविध माहिती

**ताडीच्या गुळाचा कारखाना**—औरंगाबाद जिल्ह्यांतील चिखलठाणा या गांवीं ताडीचीं झाडें मुबलक आहेत. परंतु त्यांचा कांहीं उपयोग करून घेण्यांत येत नाहीं. हैदराबाद राज्य-सरकारनें ह्या ठिकाणीं ताडगुळाचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. ही योजना खादी व ग्रामोद्योग संघटनेमार्फत अंमलांत आणण्यांत येणार आहे.

**भिकाऱ्यांवर कर लादण्याचा परिणाम**—पाकिस्तानी पंजाबच्या भालवाल नांवाच्या गांवांत आतां फारसे भिकारी दिसत नाहींत, असें समजतें. ह्या गांवच्या म्युनिसिपालिटीनें वर्षांत आलेल्या प्रत्येक भिकाऱ्यावर महिना दोन आणे कर बसविण्याचें ठरविलें. त्याबरोबर भिकाऱ्यांची संख्या एकदम बरीच कमी झाली. तरी सुद्धां कांहीं भिकाऱ्यांकडून २० रुपये कराची वसुली करण्यांत आली.

**कलकत्त्यामधील ट्रॅमचे दर वाढणार?**—कलकत्ता येथील ट्रॅम्वे कंपनी ब्रिटिश भागीदारांच्या मालकीची आहे. ही कंपनी आपले दर वाढविण्याचा विचार करीत असल्याचें समजतें. कंपनीचे अध्यक्ष मि. वेब पुढील महिन्यांत प. बंगाल सरकारशीं वाटाघाटी करण्यासाठी भारतांत येणार आहेत.

**रशियाचें पाकिस्तानला आमंत्रण**—रशियानें पाकिस्तानच्या सरकारला एकादें आर्थिक शिष्टमंडळ धाडण्याची सूचना केली होती. त्या सूचनेचा स्वीकार करून पाकिस्तानतर्फे ८ जणांचें प्रतिनिधीमंडळ रशिआला पाठविण्यांत येणार आहे. पुढील महिन्याच्या ६ तारखेस हें मंडळ रशिआला जाण्यास निघेल.

**शेतकऱ्यांसाठी शिक्षण-योजना**— ब्रिटनमधील वॉरविकशायरमध्यें शेतींत यांत्रिक अवजारांचा उपयोग कसा करून घ्यावा ह्यासंबंधींचें शिक्षण देणारा एक वर्ग काढण्यांत येणार आहे. वर्ग २ आठवडे चालणार असून निरनिराळ्या देशांतील ७० तज्ज्ञ शेतकरी त्यासाठी ब्रिटनला जाणार आहेत. उष्ण व समशीतोष्ण देशांत शेतीच्या यांत्रिक अवजारांचा उपयोग करून उत्पादन कसें वाढवितां येईल, तें वर्गांत शिकविण्यांत येणार आहे.

**सिने-कलावंत रशिआला जाणार**— भारतामधील सिने-कलावंतांचें एक प्रतिनिधीमंडळ नुकतेच विमानानें मॉस्कोला गेलें. बहुतेक कलावंतांनीं रशिआंतील सिनेमासंबंधीं बरींच पुस्तकें डोळ्याखालून घातलीं. राजकपूर, नर्गीस आणि कॅमेरामन करमरकर ह्यांनीं मात्र शक्य तितके अधिक रशियन चित्रपट पहाण्याचा सपाटा चालविला होता. त्यांनीं १८ रशिअन चित्रपट पाहून घेतले.

**श्रीनगर-लेह विमानवहातूक**—लडाख प्रांताची राजधानी लेह आणि श्रीनगर ह्यांच्या दरम्यान विमान-वहातूक सुरू झाली आहे. ह्या मार्गावर दर पंधरा दिवसांनीं एक खेप करण्यांत येणार आहे.

**मुंबई राज्यासाठी इलेक्ट्रिसिटी बोर्ड**—भारताचे नियोजन-मंत्री, श्री. गुलझारीलाल नंदा नुकतेच मुंबईला येऊन गेले. त्यावेळीं लोकसभेंतील मुंबई राज्याच्या सभासदांशीं नगर व नाशिक ह्या शहरांच्या विजेच्या पुरवठ्यासंबंधी त्यांनीं चर्चा केली. मुंबई राज्यासाठी एक इलेक्ट्रिसिटि बोर्डहि निर्माण करण्यांत येणार असल्याचें त्यांनीं सांगितलें.

**तिसऱ्या वर्गाच्या उतारूंची सोय**—तिसऱ्या वर्गाचे जे उतारू लांब प्रवास करणारे असतील त्यांच्यासाठी झोंपण्याची व्यवस्था करण्याचें रेल्वे बोर्डानें ठरविलें आहे. प्रथम ही व्यवस्था जनता एक्सप्रेस गाड्यांवर चालू करण्यांत येईल.

**पुरांना आळा घालण्याची योजना**—उत्तर-प्रदेशाच्या पूर्व भागांतें नद्यांच्या पुरापासून संरक्षण करण्यासाठी म्हणून राज्य सरकार ३५ कोटी रुपये खर्च येणारी एक योजना तयार करणार आहे. राज्य-सरकारच्या पाटबंधारे खात्यातर्फे ही योजना येत्या डिसेंबरपर्यंत सादर करण्यांत यावी, असें सुचविण्यांत आलें आहे. उत्तर-प्रदेशांत पुरामुळें दरवर्षी ४ कोटी रुपयांचें नुकसान होतें असा अंदाज करण्यांत आला आहे.

**हिंदी रेल्वेजची कामगिरी**—चालू वर्षाच्या पहिल्या सात वहातुकीचे महिन्यांत भारतामधील रेल्वेजनीं दररोज सरासरी २८ नवे डबे उपयोगांत आणण्यास सुरवात केली असा हिशोब करण्यांत आला आहे. एकूण डब्यांपैकी ८० टक्के डबे भारतामधील कारखान्यांतूनच तयार झालेले होते. बाकीचे अरुंद रुळावर चालणारे होते व ते परदेशांतून आयात केलेले होते.

**पंढरपूरला प्रदर्शन भरणार**—सोलापूर-जिल्हा-विकास बोर्डानें नोव्हेंबर ६ ते १० तारखेपर्यंत पंढरपूर येथें एक शेती व औद्योगिक प्रदर्शन भरविण्याचें ठरविलें आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्यासाठी जिल्ह्यातर्फे कांहीं योजना तयार करण्यांत येत आहेत, असें समजतें.

**साबरमती नदीयोजना**—साबरमती नदीच्या पाण्याचा उपयोग शेतीसाठी करून घेण्याची योजना मध्यवर्ती-सरकारला सादर करण्यांत आली आहे असें समजतें. ह्या योजनेला २२ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. योजना पूर्ण झाल्यावर अहमदाबाद, मेहसाणा आणि साबरकंठा जिल्ह्यांतील हजारों एकर जमिनीला निश्चित पाणी-पुरवठा होऊं लागेल.

**मालेगांव येथील साखरेचा कारखाना**—नाशिक जिल्ह्यांत मालेगांव येथें सहकारी तत्त्वावर साखरेचा कारखाना काढण्यांत येणार असल्याचें प्रसिद्धच आहे. संकल्पित कारखान्याच्या पुरस्कर्त्यांनीं १ सप्टेंबरपासून ५१,००० रुपयांचें भांडवल जमविलें असें समजतें.

### बँकर्स ट्रेनिंग कॉलेजचें उद्घाटन

रिझर्व्ह बँकेनें स्थापन केलेल्या बँकर्स ट्रेनिंग कॉलेजचें उद्घाटन बँकेचे गव्हर्नर श्री. बी. राम राव ह्यांनीं गेल्या आठवड्यांत केलें. त्यावेळीं ते म्हणाले—"आपली औद्योगिक प्रगति बँकिंग व्यवसायाच्या पातळीवर अवलंबून आणि बँकांनीं व्यापार-उद्योगाच्या गरजा भागविण्याच्या पात्रतेवर अवलंबून राहील. ज्या हिंदी बँकांचे व्यवहार लबाडीचे होते, त्या आधीच बंद पडल्या आहेत किंवा त्यांचे व्यवहार त्यांना स्थगित करावे लागतात. कांहीं वर्षांपूर्वी ज्याला बँकिंगची कांहींहि माहिती नाहीं, असे लोकहि बँका स्थापन करूं शकत होते. युद्धकाळांतील चलनविस्तारामुळें शेंकडो बँका निघाल्या, त्यांपैकीं सुमारें २०० बँकांना त्यांचे दरवाजे बंद करावे लागले आहेत. त्यांत मुख्यतः मध्यम वर्गाच्या सुमारें ३० कोटी रुपयांच्या ठेवी अडकलेल्या आहेत. चार वर्षांपूर्वी रिझर्व्ह बँकेनें बँकांच्या तपासणीची पद्धत सुरू केली, त्यामुळें देशांतील प्रत्येक बँकेचे दोष व कार्यपद्धति ह्यांची माहिती रिझर्व्ह बँकेजवळ जमली आहे.

"प्रस्तुत ट्रेनिंग कॉलेजला भारतांतील सर्व बँकर्सचा हार्दिक पाठिंबा मिळालेला आहे. मि. हेन्स, कॉलेजचे प्रिन्सिपॉल व त्यांचे सहकारी मि. हार्वे हे दोघेहि मूळ इंग्लंडमधील मिडलंड बँकेंतील असून त्यांच्या मार्गदर्शनाचा फायदा कॉलेजला मिळणार आहे."

---

### दि कॉसमॉस को. अर्बन बँक लि., पुणें

वृत्तांत वर्षांत कॉसमॉस बँकेच्या सभासदांची संख्या २,६०८ वरून २,७१६ वर गेली. सल्लागार मंडळाच्या एकूण १२ सभा व कार्यकारी मंडळाच्या ४७ सभा झाल्या. बँकेनें एकूण ३,७८,०१८ रु. चीं कर्जें दिलीं व ३,५५,५४१ रु. ची कर्जफेड झाली. गतवर्षीचे तत्सम आकडे ३,८६,००८ रु. व ३,६३,१९५ रु. असे होते. थकबाकी ८.७% आहे. थकबाकीचें प्रमाण कमी करण्यासाठीं बँकेनें कसून प्रयत्न चालविले आहेत. सहकारी सुवर्ण महोत्सवाचे निमित्तानें पुणें सें. को. बँकेनें पुणें जिल्ह्यांतील नागरी सहकारी बँकांकरितां एक फिरती ढाल ठेविली, ती कॉसमॉस बँकेस मिळाली, हें तिला भूषणावह आहे. पुणें अर्बन को. बँक्स असोसिएशनची कॉसमॉस बँक सदस्य झाली आहे. वृत्तांत वर्षीं बँकेकडील ठेवींत वाढ झाली असून खेळतें भांडवलहि वाढलें आहे. "तुलनात्मक दृष्ट्या बँकेनें आपल्या व्यवहारांत चांगली प्रगति केलेली आहे" असा अभिप्राय आय-व्यय निरीक्षक श्री. गो. द. आपटे ह्यांनीं १९५२-५३ सालचे हिशेब तपासून व्यक्त केला आहे. बँकेच्या आजवरच्या लौकिकास धरूनच कार्यकारी मंडळानें आपली कामगिरी बजावली आहे. (कार्याध्यक्षः वि. ना. दात्ये; कार्यवाहः य. श्री. शाळिग्राम).

---

### मद्रास राज्यांतील २,००० खेड्यांत विजेचे दिवे

मद्रास राज्यांतील २,००० खेड्यांना वीजपुरवठा होतो. इतर कोणत्याहि राज्यांत इतक्या खेड्यांपर्यंत वीज पोचलेली नाहीं.

---

### १० लाख मालमत्तेवर ६ लाख वारसा कर

"डेली टेलिग्राफ"चे मालक व प्रमुख संपादक गेल्या जूनमध्यें मृत्यु पावले, तेव्हां त्यांनीं १०,००,००० पौंड मालमत्ता आपल्या मागें ठेवली. त्यावर ६,१०,००० पौंड वारसा कर भरावा लागला.

### हुबळीच्या कॉमर्स कॉलेजांत "डमी बँके"ची स्थापना

हुबळी येथील जे. जी. कॉलेज ऑफ कॉमर्समध्यें कर्नाटक विद्यापीठाचे व्हाइस चान्सेलर, श्री. डी. सी. पावटे, ह्यांनीं "बँक ऑफ एज्युकेशन"चें नुकतेंच उद्घाटन केलें. बँकिंगच्या विद्यार्थ्यांना बँकांचे व्यवहार शिकविण्यासाठीं ह्या बँकेचा उपयोग केला जाणार आहे. तिचें "वसूल भांडवल" २५,००० रु. आहे. नकली चलनी नोटा छापून घेण्यांत येत आहेत व चिल्लरीची अशीच व्यवस्था करण्यांत येणार आहे. श्री. बी. आर. केंभावी, बँकिंगचे प्रोफेसर, ह्यांच्या हाताखालीं ह्या "बँकेंत" तीन महिन्यांचें प्रात्यक्षिक शिक्षण विद्यार्थ्यांना मिळेल. श्री. केंभावी ह्यांनीं पुणें येथें "डमी बँक" काढण्याचा प्रयत्न चालविला होता, हें वाचकांच्या परिचयाचें आहेच. हुबळीमधील त्यांच्या प्रस्तुत उपक्रमास आम्हीं सुयश चिंतितों.

---

### मुंबई राज्यांतील इंजिनिअरिंगचे विद्यार्थी

मुंबई राज्यांत एकूण ६ इंजिनिअरिंग कॉलेजें आहेत व त्यांत २,६०४ विद्यार्थी पदवीचें व २,६२६ विद्यार्थी डिप्लोमाचें शिक्षण घेत आहेत. पदवी शिक्षणक्रम घेऊं इच्छिणाऱ्या सुमारें १,२०० व डिप्लोमा शिक्षणक्रम घेऊं इच्छिणाऱ्या सुमारें ९०० उमेदवारांचे अर्ज नामंजूर करावे लागतात व त्यांना प्रवेश मिळत नाहीं.

---

### श्री. मोक्षगुंडम् विश्वेश्वर अय्या

श्री. मोक्षगुंडम् विश्वेश्वर अय्या ह्यांना मंगळवार, दिनांक १४ सप्टेंबर रोजीं ९५ वें वर्ष लागलें. म्हैसूर संस्थानांतील त्यांची आर्थिक व औद्योगिक कामगिरी तर सुप्रसिद्ध आहे. मध्यवर्ती व राज्य सरकारें त्यांचा अजूनहि हैड्रो-इलेक्ट्रिक व पाणीपुरवठा योजनांचे बाबतींत सल्ला घेतात. गंगा नदीवर बांधावयाच्या पुलाबाबत शिफारसी करण्यासाठीं नेमलेल्या कमिटीचे ते अध्यक्ष होते. १९४१ सालापासून, म्हणजे ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशनच्या स्थापनेपासून, ते तिचे अध्यक्ष होते. ह्या वयांतहि त्यांची कार्यपद्धति आणि दीर्घोद्योग हीं आश्चर्यकारक आहेत.

---

### राष्ट्रीय नियोजन कर्जास १५०½ कोटी रु. मिळाले

राष्ट्रीय नियोजन कर्ज १६ सप्टेंबर रोजीं बंद झालें, तेव्हां त्यांत सुमारें १५०½ कोटी रुपये जमा झाले. कांहीं ठिकाणचे आंकडे रिझर्व्ह बँकेकडे अजून पोचले नाहींत. ते मिळाल्यावर, कर्जाचा निश्चित आंकडा जाहीर होईल.


पुण्यांत मुंबई राज्याचें

**खादी ग्रामोद्योग प्रदर्शन**

उद्घाटन राष्ट्रपति डॉ. राजेन्द्र प्रसाद यांचे हस्तें होईल. येत्या नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यांत सुरू होणाऱ्या भव्य प्रदर्शनांत ग्रामोद्योग व गृहोद्योगांचीं प्रात्यक्षिकें व विक्रीच्या वस्तू ठेवण्यासाठीं आपापले गाळे अथवा जागा राखून ठेवा. अटी व सविस्तर माहितीसाठीं लिहा:—

**चिटणीस, खादी ग्रामोद्योग प्रदर्शन समिति, ३६१ सदाशिव पेठ, पुणें २.**

# अर्थ

बुधवार, ता. २१ सप्टेंबर, १९५४





*संस्थापक :*
प्रो. वामन गोविंद काळे
*संपादक :*
श्रीपाद वामन काळे


### कोलंबो योजनेंत जपानला आमंत्रण

दक्षिण आशिआ आणि आग्नेय आशिया ह्यांचा आर्थिक विकास सहकारी तत्त्वावर घडवून आणण्यासाठी कोलंबो योजनेचा उपक्रम करण्यांत आला. ह्या योजनेंत पूर्ण सभासद म्हणून सामिल होण्यासाठी आतां जपानला आमंत्रण देण्यांत येणार आहे, असें समजतें. पुढील महिन्याच्या ४ तारखेला कोलंबो योजनेच्या सल्लागार-समितीची बैठक ओटावा येथें भरणार आहे. त्यावेळीं यजमान ह्या नात्यानें कॅनडातर्फे जपान आणि सयाम ह्या दोन राष्ट्रांना आमंत्रणें देण्यांत येणार आहेत, अशी वार्ता आहे. वरील दोन्ही देशांच्या प्रतिनिधींना सभासदत्वाचीं आमंत्रणें देण्यापूर्वी ओटावा येथील बैठकीला निरीक्षक म्हणून प्रतिनिधी धाडण्याची सूचना करण्यांत येणार आहे. जपानचे दोन मोठे शेजारी, रशिआ व चीन, हे कम्युनिस्ट आहेत. जपानला बिगर-कम्युनिस्ट राष्ट्रांच्या पंक्तींत कायमचे आणण्याच्या हेतूनें हा पवित्रा टाकण्यांत आला आहे, असा राजकीय निरीक्षकांचा अंदाज आहे. तथापि, राजकारण सोडून दिलें तरीसुद्धां जपानचें कोलंबो योजनेंत पदार्पण झाल्यास ती एक महत्त्वाची घटना ठरणार आहे. कारण, ह्या योजनेंत जपान सामील झाला तर तो दाता ह्या नात्यानेंच होईल. आशिआंतील बऱ्याच राष्ट्रांच्या मानानें जपान औद्योगिकदृष्ट्या पुढारलेला आहे. अर्थात, जपान-पासून दुय्यम प्रतीच्या धंद्यांना लागणारें औद्योगिक साहित्य मिळण्यास अडचण पडणार नाहीं. आशिआंतील कित्येक देशांत अशाच प्रकारचे उद्योगधंदे हवे आहेत. औद्योगिक अवजारांच्या बदला जपानला आशिआंतील राष्ट्रांकडून कच्चा माल मिळूं शकेल.

### किंमतींच्या पातळीचा समतोलपणा

कोणत्याहि देशाच्या अर्थव्यवस्थेचे जे निरनिराळे विभाग असतात त्यांच्यांत एकप्रकारचा समतोलपणा असतो किंवा तसा तो राखावा लागतो. नाहीं तर सर्वच अर्थव्यवस्थेला धोका उत्पन्न होतो. गेल्या कांहीं महिन्यांत शेतीच्या मालाच्या किंमती उतरत चालल्या आहेत. ह्या गोष्टीचा परिणाम इतर मालाच्या किंमतीवर कमी-अधिक प्रमाणांत व काळांत होत असतो. इंडियन मर्चंटस चेंबरचे अध्यक्ष, श्री. चिमणलाल पारेख, ह्यांनीं ह्या विषयासंबंधीं चेंबरच्या तिमाही सभेपुढें नुकतेंच एक भाषण केलें. ते म्हणाले कीं, अर्थव्यवस्थेच्या निरनिराळ्या विभागांतील किंमतमध्यें समतोलपणा राखणें जरूर आहे. विशेषतः शेतीच्या मालाच्या किंमतींची सध्यां जी रचना आहे तिच्याकडे लक्ष पुरविणें अगत्याचें आहे. त्याचप्रमाणें, खेडेगांवीं राहणाऱ्या लोकांच्या आर्थिक जीवनांत ज्या पक्क्या मालाला स्थान आहे अशा मालाच्या किंमतींवरहि लक्ष ठेवणें जरूर आहे. गेल्या कांहीं काळांत उद्योगधंद्यांतील वेतनाचा खर्च हा कांहींसा कायम होऊन बसला आहे. शेतीच्या मालाच्या घसरलेल्या किंमती लक्षांत घेतां वेतनांत फरक करणें जरूर पडेल. शेतीच्या व्यवसायांत किमान वेतन देण्यासंबंधी अलीकडे विचार चालू आहे. परंतु ह्या बाबतींत सावधगिरीनें पावलें टाकलीं पाहिजेत. शेतीच्या मालाच्या उत्पादनाच्या किंमतीला थोडेंफार निश्चित स्वरूप झाल्यावर किमान वेतनाचा विचार करण्यांत यावा. बाजारपेठेंत शेतीचा माल फार आला तर त्याच्या किंमती घसरण्याचा संभव असतो हें खरें. पण योग्य वेळीं आणि योग्य ठिकाणीं अन्नाचा सांठा करण्यासाठी सरकारला धान्य-खरेदी करतां येईल व त्याचा इष्ट परिणाम होईल.

### त्रावणकोर-कोचीनची दुसरी पंचवार्षिक योजना

त्रावणकोर-कोचीन राज्यासाठी दुसरी पंचवार्षिक योजना आंखण्याचें काम राज्य-सरकारनें चालू केलें आहे. सरकारच्या अर्थखात्याला भज्यांतच उपलब्ध होऊं शकणाऱ्या साधनसामुग्रीचें मोजमाप करण्यासाठी सूचना करण्यांत आली आहे. खात्याकडून ह्यासंबंधीच्या माहितीचा अहवाल आल्यावर पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करण्याच्या कामास प्रारंभ होईल. बहुधा चालू सालच्या डिसेंबर पर्यंत खात्याकडून अहवाल येईल, व १९५५ च्या ऑक्टोबरच्या सुमारास दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची चर्चा सुरू होईल. त्यानंतरच लवकरच अखेरची योजना सादर करण्यांत येईल, आणि १९५६ च्या फेब्रुआरी महिन्यांत ती प्रसिद्ध करण्यांत येईल. प्रत्येक खात्यानें आपल्यातर्फे सादर करण्यांत येणाऱ्या उप-योजना कशा तयार कराव्या ह्यासंबंधीं सूचनाहि देण्यांत आल्या आहेत. वरील योजनेंत समाविष्ट करण्यासाठीं म्हणून १५ कोटी रकमेचीं पाटबंधाऱ्याचीं कामें नमूद करण्यांत आलीं आहेत. त्याशिवाय, सुमारें ३३ कोटी रुपये खर्च येणारा विजेच्या उत्पादनाचा एक कारखाना काढण्याचेंहि ठरविण्यांत आलें आहे. राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत अशा प्रकारच्या दुसऱ्या कारखान्यांनाहि महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें आहे. राज्यातर्फे तयार करण्यांत येणारी पंचवार्षिक योजना भारतीय सरकारच्या नियोजन-समितीकडे धाडण्यांत येईल.

### "दि टाइम्स "ची उडती आवृत्ति

लंडन येथें प्रसिद्ध होणाऱ्या " दि टाइम्स " ह्या वृत्तपत्राची विमानांतून पाठविण्याची मूळ मजकुराची, पण वजनानें हलकी प्रत प्रसिद्ध होऊं लागली, त्या गोष्टीस आतां दहा वर्षें पुरीं झालीं. खुद्द लंडन शहरांत लोकांना घरीं 'टाइम्स' मिळतो, त्याच्या आधींच परदेशांसाठी खास आवृत्ति विमानांतून प्रवास करूं लागलेली असते. लंडनमधील आवृत्तीप्रमाणेंच ही आवृत्ति असते; फक्त कागद वजनानें हलका असतो, तो छापण्यासाठी विशिष्ट तऱ्हेची शाई लागते व पातळ कागद छपाईचे वेळीं फाटूं नये म्हणून यंत्रांतहि आवश्यक ते फेरफार करावे लागतात. नेहमींच्या कागदापेक्षा ह्या " उडत्या " वृत्तपत्राचा कागद चौपट महाग असतो, परंतु "टाइम्स"च्या विक्रीच्या किंमतींत वाढ केलेली नाहीं. अंतराप्रमाणें खर्च वाढतो, तो मात्र किंमतींत मिळविला जातो. उदाहरणार्थ, जिब्राल्टर येथें एका प्रतीस ६ पेन्स पडतात, तर ऑस्ट्रेलिआंत २ शिलिंग किंमत पडते.

## दि सारस्वत को. बँक लि., मुंबई

सारस्वत को. बँकेची प्रगति अखंड चालू आहे व तिची मजबुती वाढतच चालली आहे. ३० जून, १९५४ अखेर तिच्या पटावरील ३,८९१ सभासदांपैकी ७९८ स्त्री-सभासद आहेत. एकुण वसूल भांडवल ७,२७,१८० रु. असून एकूण खेळतें भांडवल १,४३,७४,१२२ रुपयांवर गेलें आहे. बँकेचे वेगवेगळे रिझर्व्ह १३,०८,८७७ रु. चे आहेत. बचतीच्या आकर्षक योजना वेळोवेळ आखुन बँकेनें मागीदारांत काटकसरीच्या संवयीची वाढ केली आहे आणि बँकेकडील ठेवींहि त्यामुळें वाढल्या आहेत. ठेवींपैकी ७४·२% रक्कम "तरती" राखण्यांत आली आहे. ३० जून अखेर येणें कर्ज ४५,६६,८४८ रु. असून तें खेळत्या भांडवलाच्या ३१·५% आहे. हुंड्या डिस्कौंट करून बँक खऱ्या व्यापारी व्यवहारांस मदत करते. वक्तशीर हप्ते भरणाऱ्या कर्जदारांना भरपूर रिबेट देण्याचें बँकेचें धोरण आहे, व तें चांगल्या संवयींस उत्तेजन देणारें आहे.

राष्ट्रीय नियोजन कर्ज जाहीर होतांच, बँकेनें :"नॅशनल डेव्हलपमेंट सेव्हिंग्ज स्कीम" नांवाची योजना आखली. ३½% चें नियोजन कर्ज मासिक हप्तांनीं घेऊन नव्या भारताच्या उभारणीस सर्वांना हातभार लावतां यावा, असा त्यांत हेतु होता. ह्या योजनेंतील सवलतींची माहिती "अर्था" च्या २१ एप्रिलच्या अंकांत देण्यांत आली होती. रजिस्ट्रारची सहकारी कायद्याच्या ३४ (१) कलमाप्रमाणें परवानगी घेऊन, बिगर-सभासदांनाहि योजनेचा फायदा बँकेनें घेऊं दिला. अशा रीतीनें ७५ लोकांनीं मिळून १,७१,००० रु. राष्ट्रीय नियोजन कर्जांत गुंतविले. जो पैसा सामान्यतः सरकारच्या कर्जाकडे वळूं शकला नसता, तो सारस्वत बँकेनें आकर्षिला व लोकांच्या बचतीस प्रोत्साहन दिलें, ही बँकेची फारच महत्त्वाची कामगिरी झाली. सारस्वत बँकेनें अगदीं प्रारंभींच पुढाकार घेऊन आपली जागरूक कर्तव्यतत्परता दाखविली, हें चालकांना भूषणावह आहे. राष्ट्रीय नियोजन कर्जांत बँकेनें स्वतःचे १७ लक्ष रु. गुंतवले आहेत. बँकेचा कारभार, हिशेबपद्धति, अहवालांतील तपशील, सभासदांच्या सोई पहाण्याची तळमळ, इत्यादि सर्व गोष्टी इतर सहकारी बँकांना खासच अनुकरणीय वाटतील. (चेअरमन : वा. पुं. वर्दे, बी. कॉम, एफ्. आय. बी., लंडन. सेक्रेटरी : श्री. स. वि. संझगिरी, बी. कॉम.)

## पूर्व खानदेश सें. को. बँक लि., जळगांव

वरील बँकेच्या पू. खानदेश जिल्ह्यांत १३ शाखा व १२ उपशाखा आहेत. अहवालाचे वर्षीं तीन नवीन उपशाखा उघडण्यांत आल्या व चालू वर्षीं आणि दोन नवीन उपशाखा उघडण्यांत येतील. वसूल भागभांडवल गेल्या वर्षीपेक्षा ६८,९०० रु. नीं वाढून तें १५,७३,५०० रु. झालें आहे. बँकेच्या गंगाजळींत २०,५१,१११ रु. असून तिचेकडे १,०८,१८,७१४ रुपयांच्या ठेवी आहेत. एकूण खेळतें भांडवल २,७१,०३,५५७ रु. चें आहे. अहवालाचे वर्षीं, शेतीच्या मालाच्या तारणावरील कर्जाचा व्यवहार मागील वर्षाच्या व्यवहाराच्या मानानें दुप्पट झाला आहे. एकूण येणें कर्जापैकी प्राथमिक सहकारी संस्थांकडे १ कोटी, २१ लक्ष रु. असून व्यक्तींकडे २३ लक्ष, ८३ हजार रु. आहे. अहवालाचे सालांत बँकेच्या सर्व शाखा-उपशाखा नफ्यांत आहेत. बँकेस निव्वळ नफा ३,०९,२२३ रु. झाला, तो मागील वर्षाच्या नफ्यापेक्षा ३२,४२४ रु. नीं ज्यास्त आहे. "शाखा-उपशाखांमध्यें आवश्यक


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई
शेअर भांडवल व रिझर्व रु. ११,७०,१००
ठेवी .... .... .... रु. १,१८,५८,४००
एकूण खेळतें भांडवल रु. १,३३,११,९००
शाखा:- बँकेचे सर्व व्यवहार केले जातात शाखा:-
दादर बेळगांव
माहीम पुणें
स्थापना १९१८


तेवढी शिल्लक ठेवून व्यवहारांत आलेल्या जादा रकमांची वेळच्या वेळीं केलेली किफायतशीर गुंतवणूक व एकूण व्यवहारांत झालेल्या वाढींतून मिळालेलें उत्पन्न हीं नफावाढीचीं प्रमुख कारणें आहेत." बँकेंतील हातांतील शिलकी व मार्गस्थ रकमा सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीनें त्यांचा जरूर तेथें विमा उतरविण्यांत आला आहे व विशिष्ट भागांतील शाखा-उपशाखांना बंदुकाहि पुरविण्यांत आल्या आहेत. पारोळा व जळगांव येथें सेफडिपॉझिट लॉकर्सची व्यवस्था केलेली असून आणखीहि कांहीं ठिकाणीं अशी व्यवस्था करण्याचा बोर्डाचा विचार आहे. अशा रीतीनें १,१४० सोसायट्या व २,५०९ व्यक्तिशः सभासद असलेल्या व २५ शाखा उपशाखा असलेल्या, महाराष्ट्रांतील सर्वांत मोठ्या सेंट्रल बँकेचा व्यवहार ग्रामीण जनतेच्या आर्थिक उद्धाराच्या दृष्टीनें चालविण्यांत येत आहे. (अध्यक्ष : जुलालसिंग शंकरराव पाटील, बी. ए., एलएल बी., एम. एल. ए.; मॅनेजिंग डायरेक्टर राजाराम यादवराव सोनवणे, बी. ए.; ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर : वामनराव दलपतराम साळुंखे, बी. एजी. ऑनर्स)

## पुणें सें. को. बँकेचें नवें डायरेक्टर बोर्ड

१ श्री. वि. ज. करंदीकर, चेअरमन.

२ श्री. रावसाहेब बाबूराव पवार, व्हा. चेअरमन.

३ श्री. गो. पां. पवार, ४ श्री. रा. र. गावडे, ५ श्री. शं. बा. इनामके, ६ श्री. र. आ. सांडभोर, ७ श्री. का. द. राऊत, ८ श्री. धों. आ. सातव, ९ श्री. शि. म. काळे, १० श्री. भि. रा. जोशी, ११ श्री. शं. ह. जावडेकर, १२ श्री. ना. वि. पांढव, १३ श्री. वि. त्रिं. टिळक, १४ श्री. रा. य. बोरकर, १५ श्री. शं. ल. ओगले, १६ श्री. शं. नि. अभ्यंकर, १७ श्री. र. वा. जोशी व १८ श्री. मो. वि. रबडे (पदसिद्ध).

लोकल ऑडिटर्सच्या जागीं श्री. रा. कृ. देशपांडे व श्री. बा. ल. फाटक ह्यांची निवडणूक झाली आहे.

## डॉक्टरांतील बेकारी

ऑक्टोबर, १९५१ ते एप्रिल, १९५४ ह्या मुदतींत ६३५ डॉक्टर्स व ३,०२१ इंजिनिअर्स ह्यांनीं उद्योगविनिमय केंद्रांत नांवें नोंदलीं. त्यांपैकी ९० डॉक्टर्स व ७५८ इंजिनिअर्स ह्यांना नोकरी मिळाली.

## राज्यघटनेच्या मसुद्याला १२ लक्ष दुरुस्त्या

चीनच्या राज्यघटनेच्या मसुद्याला ११,८०,४२० दुरुस्त्या सुचविण्यांत आल्या आहेत. चिनी असेंब्लीमध्यें आतां त्यांची चर्चा होऊन चीनची राज्यघटना तयार होईल.

कल्याणकारी राज्यनिर्मितीचें महत्त्वाचें पाऊल

# औद्योगिक कामगारांच्या आरोग्य सुधारणेची आणि सामाजिक सुरक्षिततेची योजना

येत्या २ ऑक्टोबर रोजीं देशभर गांधीजयंती साजरी केली जाईल व त्यावेळीं मुंबईत कामगार विमायोजनेच्या अंमलबजावणीस सुरुवात होईल आणि त्यायोगें बृहन्मुंबई व त्याच्या आसपासच्या सुमारें ४॥ लाख कामगारांना सामाजिक सुरक्षितता मिळवून देण्यांत येईल. सुमारें १,६०० कारखान्यांतील व कंपन्यांतील कामगारांना या योजनेचा फायदा मिळूं लागेल.

१९४८ च्या एप्रिलमध्यें भारतीय पार्लमेंटनें कामगार विमायोजनेसंबंधीचा कायदा मंजूर केल्यानंतर दिल्ली, कानपूर, नागपूर आणि पंजाबमधील आठ शहरांतून सदरहू योजनेची अंमलबजावणी सुरू करण्यांत आली असून एकूण दोन लाख कामगारांना त्याचा फायदा मिळाला आहे. येत्या दोन वर्षांत सबंध देशभर या योजनेची अंमलबजावणी सुरू झाली म्हणजे एकूण २५ लाख कामगारांना त्याचा फायदा मिळेल असा अंदाज आहे. दरम्यानच्या काळांत मुंबई राज्यांत सदरहू योजनेच्या अंमलबजावणीचा महान् प्रयोग कितपत यशस्वी होतो इकडे अवघ्या जगाचें लक्ष वेधून राहील. कारण, कल्याणकारी राज्याचें तें एक महत्त्वाचें अंग असून आशिया आणि जगांतील इतर ठिकाणच्या औद्योगिक कामगारांना सामाजिक सुरक्षितता मिळवून देण्याच्या दृष्टीनें टाकण्यांत येणारें तें एक पाऊल आहे.

### योजनेमुळें होणारे फायदे

हंगामी कारखान्यांव्यतिरिक्त विजेवर चालणाऱ्या ज्या कारखान्यांत २० किंवा त्याहून अधिक कामगार असतील अशा कारखान्यांना प्रथम हा कायदा लागू करण्यांत येणार असून अशा कारखान्यांत कोणत्याहि कामासाठी परभारें किंवा कंत्राटदारांमार्फत नेमण्यांत आलेल्या महिना ४०० रुपयांपर्यंत वेतन• मिळणाऱ्या सर्व कामगारांना या योजनेचा फायदा मिळेल. भारतांतील कामगार विमा कायद्याच्या कक्षेंतून सामान्यतः कारकुनी पेशाचा नोकरवर्ग वगळण्यांत आला आहे. परंतु सदरहू योजना या वर्गांतील कामगारांनाहि लागू करण्यांत यावयाची आहे, हें तिचें वैशिष्ट्य आहे. त्याचप्रमाणें, इतर प्रकारच्या कंपन्यांतील नोकरांनाहि ही योजना लागू करण्याची तरतूद सदरहू कायद्यांत करण्यांत आली आहे.

या योजनेखाली कामगारांना पुढील फायदे मिळतील:— (अ) विमेदाराला मोफत वैद्यकीय सल्ला व औषधपाणी मिळेल, (ब) विमेदार कामगार आजारी असेल त्यावेळीं त्याला कांहीं ठराविक वेतन देण्यांत येईल, (क) आजारी विमेदार स्त्री-कामगारांनाहि असाच फायदा मिळेल, (ड) विमेदार कामगाराला काम करीत असतांना तात्पुरत्या स्वरूपाचें वा कायम स्वरूपाचें अपंगत्व आल्यास त्यालांहि वरीलप्रमाणें पगार देण्यांत येईल, आणि (फ) ज्या कामगाराचा काम करीत असतां अपघात होऊन त्यांत मृत्यु झाला असेल त्याच्यावर अवलंबून असलेल्या त्याच्या नातेवाइकांना उपरोक्त पगार मिळेल.

### वैद्यकीय काळजी व रोख रकमेचा फायदा

विमेदाराच्या आजारीपणांत त्याला तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला, हॉस्पिटल, खास तपासणी, खास प्रकारची काळजी, आवश्यक त्या औषधांचा पुरवठा, ड्रेसिंग, वगैरे प्रकारचा फायदा मिळेल. ज्यावेळीं विमेदाराला आजारीपणामुळें सदरहू योजनेंतील आपल्या डॉक्टरकडे जाणें अशक्य असेल त्यावेळीं डॉक्टर त्याच्या घरीं जाऊन त्याला तपासतील. विमेदार स्त्रीची गरोदरपणांत व बाळंतपणांत काळजी घेतली जाईल.

विमेदार आजारी असेल व त्यामुळें तो कामावर जाऊं शकत नसेल तर त्याला आजारीपणांतील दिवसांत दररोजच्या रोजंदारीच्या सरासरी निम्म्याइतकी रोजंदारी मिळेल. हा फायदा ३६५ दिवसांच्या अखंड नोकरींत फक्त ५६ दिवस मिळूं शकेल.

बाळंतपणासाठी प्रसूतीच्या अपेक्षित दिवसांपूर्वी ६ आठवडे आणि प्रसूतीनंतर ६ आठवडे मिळून ऐकूण १२ आठवडे दररोज १२ आणे किंवा आजारीपणाचा दर यांपैकीं जो जास्त असेल त्या दरानें फायदा मिळेल. बाळंत झालेली स्त्री या मुदतीनंतरहि आजारीपणामुळें कामावर जाऊं शकली नाहीं तर तिला आजारीपणाचा फायदा पुढेंहि मिळूं शकेल.

काम करतांना तात्पुरतें अपंगत्व आल्यास त्या काळांत निम्म्या पगाराइतकी रक्कम मिळेल आणि कायमचें अपंगत्व आल्यास त्या अपंगत्वाच्या स्वरूपाप्रमाणें हयातभर पेन्शन मिळेल. काम करतांना झालेल्या दुखापतीमुळें विमेदार कामावर मरण पावल्यास त्याच्या बायकोला व मुलांना आणि तीं नसतील तर वृद्ध मातापित्यांना फायदा मिळेल. बायकोच्या बाबतींत तिच्या हयातीपर्यंत अथवा ती पुनर्विवाह करीपर्यंत आणि मुलांना तीं १४ वर्षांचीं होईपर्यंत किंवा कॉर्पोरेशनला समाधानकारक वाटेल अशा रीतीनें तीं शिक्षण घेत असल्यास १८ वर्षेपर्यंत हा फायदा मिळेल. बायकोला अपंगत्वाच्या फायद्याच्या पूर्ण दराच्या तीन पंचमांश आणि मुलांना दोन पंचमांशाइतकी रक्कम मिळेल. मात्र, सर्व नातेवाईकांना अशा रीतीनें द्यावयाची रक्कम पूर्ण दराच्या एकूण रकमेपेक्षा अधिक असणार नाहीं.

### वर्गणी

या योजनेसाठी लागणारा पैसा प्रामुख्यानें मालक आणि कामगार यांच्याकडून वर्गणी गोळा करून उभारलेल्या निधींतून पुरविण्यांत येईल. दररोज सरासरी एक रुपयाहून कमी ते आठ रुपयांहून अधिक इतकी रोजंदारी मिळविणाऱ्या कामगारांचे त्यांना मिळणाऱ्या रोजंदारीवरून आठ वर्ग पाडण्यांत आले आहेत. त्यांना साधारणपणें रोजंदारीच्या दोन टक्के इतकी वर्गणी भरावी लागेल. मात्र, एका रुपयापेक्षा कमी रोजंदारी मिळणाऱ्या कामगारांना कांहींहि वर्गणी भरावी लागणार नाहीं. ज्या मुदतींत कामगार कामावर नसेल आणि त्यास कांहींहि रोजंदारी मिळाली नसेल त्या मुदतीसाठी त्याला कांहींहि वर्गणी भरावी लागणार नाहीं. तथापि अधिकृत रजा, कायदेशीर संप अगर टाळेबंदी या काळाच्या बाबतींत कामगाराला वर्गणी भरावी लागेल. अशा काळाबद्दल कामगाराला कांहींहि रोजंदारी मिळाली नसेल तर कामगारांची वर्गणी मालकांना भरावी लागेल. फंडाच्या कारभारासाठी जो खर्च येईल त्यांपैकीं दोन-तृतीयांश इतका खर्च मध्यवर्ती सरकार पहिलीं पांच वर्षें देईल आणि वैद्यकीय उपचारासाठी येणाऱ्या खर्चाचा ठराविक हिस्सा राज्यसरकार देईल. सध्यां राज्यसरकारचें प्रमाण एक चतुर्थांश इतकें ठरविण्यांत आलें आहे.

### "मेडिकल पॅनेल" ची पद्धत

मुंबईत वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांचा कामगारांना फायदा मिळवून देण्यासाठी एक "पॅनेल" (यादी) पद्धत सुरू करण्यांत आली आहे. याबाबत डॉक्टरांची संघटना निर्माण करण्याची जबाबदारी राज्यसरकारवर आहे आणि याबाबतच्या व्यवस्थेवर देखरेख ठेवण्याची जबाबदारी मुंबई सरकारचे सर्जन

जनरल यांचेकडे आहे. योजनेंतील वैद्यकीय मदतीबाबतच्या तरतुदींचा कार्यक्षम रीत्या अंमलबजावणी व्हावी याहृष्टीनें कायद्याबरहुकूम नियम तयार करण्यांत आले आहेत. ॲलोपॅथिक आणि आयुर्वेदिक पद्धतीनें व्यवसाय करणाऱ्या अनेक वैद्यक व्यवसायींची विमा–वैद्यक व्यवसायी म्हणून नोंद करण्यांत आली आहे. या वैद्यक व्यवसायींनीं आपले दवाखाने शहरांतील कामगारांच्या वस्तीजवळ ठेवले पाहिजेत. त्याचबरोबर त्यांचे राहण्याचें ठिकाण दवाखान्याजवळ असलें पाहिजे आणि शिवाय त्यांच्या दवाखान्यांत वेटिंग रूम, कन्सल्टेशन रूम आणि औषधोपचाराच्या सोयी, वगैरे सोयी असल्यास पाहिजेत. विमा कामगाराला आपला वैद्यक-व्यवसायी निवडण्याची मुभा आहे, आणि प्रत्येक वैद्यक-व्यवसायीला जास्तींत जास्त २,००० विमा–कामगारांकडे लक्ष द्यावें लागेल. महाग आणि खास अशीं औषधें आणि इंजेक्शन्स वगैरे माल राज्यसरकार पुरविणार आहे. शिवाय, स्पेशालिस्टांकडून तपासणी, कामगाराला इस्पितळांत ठेवण्याची सोय करणें, ॲम्ब्युलन्स गाडीची सोय करणें, वगैरे बाबींची योजनेंत तरतूद करण्यांत आली आहे. महात्मा गांधींचें स्मारक म्हणून विमा-कामगारांसाठी मुंबई शहरांतील परळ भागांत ५४ लाख रुपये खर्च करून एक खास इस्पितळ बांधण्यांत येणार आहे.

### कारभारविषयक यंत्रणा

या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी एक कायदेशीर कॉर्पोरेशन स्थापन करण्यांत आलेलें आहे. याशिवाय गेलीं तीन वर्षें एक प्रादेशिक कचेरी कार्य करीत आहे. आतां सदरहू कॉर्पोरेशन बृहन्मुंबईंत आणि आजूबाजूच्या भागांत २४ स्थानिक कचेऱ्या सुरू करणार आहे. या कचेऱ्या प्रामुख्यानें विमा–कामगाराला जो पैसा देण्यांत येईल त्याबाबत लक्ष पुरविणार आहेत. या कचेऱ्या कामगारांच्या वस्तींत असतील, तसेंच विमा-कामगारांना जरूर तो सल्ला पुरविण्याचें कार्यहि या कचेऱ्यांतून केलें जाईल. मुंबई विभागांत योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी एक प्रादेशिक मंडळहि स्थापन करण्यांत येत आहे. मुंबई विभागांत मुंबई, मध्यप्रदेश, मध्य भारत, सौराष्ट्र, कच्छ आणि भोपाळ या सहा राज्यांचा समावेश होतो. मुंबई राज्याचे कामगारमंत्री हे या मंडळाचे अध्यक्ष राहतील आणि कॉर्पोरेशनचे रीजनल डायरेक्टर हे मंडळाचे चिटणीस म्हणून काम पाहतील योजनेच्या अंमलबजावणीसंबंधींच्या सर्व महत्त्वाच्या प्रश्नांबाबत हें मंडळ सूचना देईल आणि निर्णय करील. याशिवाय, महत्त्वाच्या केंद्राच्या ठिकाणीं स्थानिक समित्याहि नेमण्यांत येतील.

### वैशिष्ट्यपूर्ण प्रगति

या योजनेचें यश मालक, कामगार आणि कॉर्पोरेशनचे व राज्य सरकारचे अधिकारी यांच्या सहकार्यावर व सबंध संघटनेच्या कार्यांत एकसूत्रीपणा राहण्यावर अवलंबून आहे. या योजनेबाबत सर्व प्रकारची प्राथमिक तयारी जोरांत चालू असून औद्योगिक कामगारांना आणि इतर कामगारांना सामाजिक सुरक्षितता मिळवून देणारा हा महान् प्रयोग यशस्वी होईल, अशी आशा करण्यास हरकत नाहीं. ही योजना म्हणजे कल्याणकारी राज्य निर्माण करण्याच्या दिशेनें टाकलेलें एक महत्त्वाचें पाऊल असून लोकांना सामाजिक व आर्थिक सुरक्षितता मिळवून देण्याचें उद्दिष्ट साधण्याच्या बाबतींत केलेली वैशिष्ट्यपूर्ण प्रगति आहे. कामगारांना आजारीपणांत, बाळंतपणाच्या काळांत, आणि कामावर असतांना इजा झाली असतांना पुरेशी वैद्यकीय मदत आणि आर्थिक सुरक्षितता मिळाली तर त्यांचें आरोग्य व उत्पादनक्षमता सुधारेल यांत कांहीं शंका नाहीं. या योजनेमुळें अनेक सुपरिणाम घडून येण्याची शक्यता आहे.

### इंडियन स्टँडर्डस इंस्टिट्यूशनची प्रगति

| | ३१ मार्च १९४८ | ३१ मार्च १९५० | ३१ मार्च १९५२ | ३१ मार्च १९५४ |
|---|---|---|---|---|
| १ ठरवून दिलेल्या प्रतिमानांची संख्या | — | ११० | ३०० | ४७३ |
| २ विचार चालू असलेल्या प्रतिमानांची संख्या | — | ३७० | ४९५ | ७३० |
| ३ समित्या, उपसमित्या व तुकड्यांची संख्या | ७३ | २२९ | २९७ | ४२३ |
| ४ समित्या व उपसमित्यांवरील सदस्यांची एकूण संख्या | ४८६ | १८२२ | २४१८ | ४०६६ |
| ५ वर्गणीदार सदस्यांची संख्या | ३५६ | ५६३ | ७५८ | ८९६ |
| ६ संस्थेचे अधिकारी | ६ | ११ | ११ | २३ |
| ७ इतर नोकरवर्ग | ३६ | ५८ | ८३ | ११९ |
| ८ प्रतिमान विक्रींतून मिळालेलें उत्पन्न रु. | ७०० | ३०,९०० | १,१५,१०० | १,५७,८०० |

### दि लक्ष्मी बँक लि., अकोला

पंतप्रधानांचा नॅशनल रिलीफ फंड व टाइम्स ऑफ इंडियाचा रिलीफ फंड, ह्यांसाठी पैसे स्वीकारून, ज्या त्या ठिकाणीं बँकेच्या शाखा असतील तेथें ते पैसे चार्ज न घेतां पाठविण्याचें लक्ष्मी बँकेनें मान्य केलें आहे.

WILICO
STRONGHOLD OF PROTECTION
अबाधित सर्वाधिक फायदा
हप्त्याचे व बोनसचे दर ह्यांचा
एकत्र विचार करतां आजही
वेस्टर्नच आपणांस सर्वांत जास्त
व भक्कम विम्याचें संरक्षण देतें.
आजीव वर्षासन त्या माफक
हप्त्याच्या अनेक आकर्षक योजना
अधिक माहितीकरतां आजच शाखाधिकाऱ्यांना
भेटा अगर लिहा.
किंवा ३४०२ वर फोन करा.
वेस्टर्न इंडिया विमा कं.
लि. सातारा
शाखाकार्यालय:—वेस्टर्न इंडिया हाउस, लक्ष्मी रस्ता, पुणें २

## पूर्व खानदेश सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. जळगांव

# नोटीस

नोटीस देण्यांत येते कीं, बँकेच्या भागिदारांची वार्षिक साधारण सभा बुधवार तारीख २९ सप्टेंबर १९५४ रोजीं जळगांव येथें सकाळीं ८-३० ते ११ व दुपारीं १ वाजल्यापासून पुढें नटवर थिएटरमध्यें भरेल व त्यांत पुढील कामें होतील.

१ श्री. चेअरमनसाहेब यांचें प्रास्ताविक भाषण.

२ सन १९५३-५४ सालचा अहवाल, ताळेबंद व हिशेब मंजूर करणें.

३ भागांवरील नफा ( डिव्हिडंड ) किती द्यावयाचा तें ठरविणें व सन १९५३-५४ सालचे नफ्याची वाटणी मंजूर करणें.

४ लोकल ऑडिटर व सरकारी ऑडिटर यांचे ऑडिटमेमोचा विचार करणें.

५ नियमाप्रमाणें डायरेक्टर्सच्या पांच जागा रिकाम्या होतील, त्या जागीं नवीन डायरेक्टर्स निवडणें, सोसायट्यांतर्फे तीन श्री. जुलालसिंग शंकरराव पाटील, श्री. माधवराव गोटू पाटील, श्री. केशवराव गणपतराव पाटील आणि व्यक्तिशः भागिदारांतर्फे श्री. देवराव माधवराव पाटील, श्री. ओंकारमल पुनमचंद शाह, हे डायरेक्टर्स निवृत्त होतील व ते पुन्हां निवडून येण्यास पात्र राहतील.

६. १९५४-५५ सालाकरितां चेअरमन व व्हाईस चेअरमन निवडणें.

७. सोबत दाखल केल्याप्रमाणें पोटनियम दुरुस्त्यांबद्दल विचार करणें.

८. पोटनियमाप्रमाणें कर्ज उभारण्याची मर्यादा ठरविणें.

९. श्री. चेअरमनसाहेब यांचे अगाऊ परवानगीनें आयत्यावेळीं पुढें येणाऱ्या विषयांचा विचार करणें.

**टीपः**- बँकेस जोडलेल्या प्रत्येक सोसायटीस वरील सभेकरितां फक्त एक प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क आहे. मात्र सदर प्रतिनिधीकडे सोसायटीचें तहकुबी न मिळालेलें थकबाकीचें कर्ज येणें नसलें पाहिजे व त्याबद्दल असें कर्ज येणें नाहीं असा त्यांनीं सोसायटीकडून दाखला आणला पाहिजे. अशा प्रतिनिधींनीं या सोबतचा प्रतिनिधि दाखला ठरावाचे नकलेसह त्या सोसायटीचे चेअरमन व सेक्रेटरी यांच्या दोघांच्याहि सह्या घेऊन बरोबर आणावा. अशा प्रतिनिधिदाखल्याशिवाय त्यास प्रतिनिधि समजण्यांत येणार नाहीं.

तरी याप्रमाणें ज्या सोसायट्यांस प्रतिनिधि पाठवावयाचें असतील त्यांनीं त्यांची निवड करून आम्हांस नांवें सदर बाबतींत पंच कमेटीचे ठरावाचे नकलेसह अगाऊ कळवावींत. सदर प्रतिनिधी व भागिदारांनीं सभेस हजर रहावें अशी विनंति आहे.

सभेच्या दिवशीं सकाळीं ९ ते १० वाजण्याचे वेळांत डायरेक्टर्सचे जागेसाठी उमेदवारांचीं नांवें नोंदण्यांत येतील व मतनोंदणीस दुपारीं सुरवात होईल.

**सूचना**:—तारीख २१ सप्टेंबर १९५४ पर्यंत आमचे जळगांव ऑफिसांत कळविण्यांत आलेल्या विषयांचींच मात्र माहिती सभेच्या वेळीं विचारतां येईल.

जळगांव पू. खा. }
ता. २०-८-१९५४ } **जुलालसिंग शंकरराव पाटील**
चेअरमन.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

**पुणें कचेरी**:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.


अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन. व्ही. पांडव, मॅनेजर

# किर्लोस्कर

## 'कल्याण' पॉवर शेंगायंत्र

हें यंत्र चालविण्यास ६/- अश्वशक्तीचें एंजिन लागतें. दरेक तासास ७५ ते ८० पोतीं शेंग फोडली जाते.




याशिवाय कल्याण हात आणि पॉवर शेंगायंत्र आणि कॉटेज शेंगायंत्र हीं लहान यंत्रें मिळतात. गरजेनुरूप आणि पसंतीनुरूप निवड करा.

—सविस्तर माहिती मागवा—

## किर्लोस्कर बंधु लि.

किर्लोस्करवाडी, द. सातारा.

# दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—यथायत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली — चेअरमन

श्री. गंगाराम सिद्राप्पा चौगुले, कोल्हापूर, — व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B. मॅनेजर

# सांगली बँक लि.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

मुंबई शाखा — फोर्ट

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | ४½ लाख |
| रिझर्व व फंडस् | ५¼ लाख |
| ठेवी व इतर | १ कोटी |

— व्याजाचे दर —

| | | द. सा. द. शें. |
|---|---|---|
| करंट | ... ... | रु. ½ |
| सेव्हिंग | ... ... | रु. १½ |
| स्पे. सेव्हिंग | ... | रु. २ |
| १ वर्ष मुदत | ... | रु. ३ |
| ३ वर्ष मुदत | ... | रु. ४ |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.

बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. ३८,३८१ / ३८,३८२ | पोस्ट बॉक्स नं. ४७२ / तारेचा पत्ता : फार्मबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगांसाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३४,०६,७५० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. १६,००,००० |
| | रु. ६०,०६,७५० |
| गंगाजळी व फंड | रु. ५७,५४,८०० |
| ठेवी | रु. ७,९०,२५,३०० |
| खेळतें भांडवल | रु. १२,७०,२७,००० |

## १६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे

ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५३ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,९९,००० |
| ठेवी | रु. | ७१,६८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८६,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. १-८-० | रु. १-११-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.